वाळकी येथे बिबट्याच्या हल्ल्यात शेळीचा मृत्यू

कोऱ्हाळे (वार्ताहर)– राहाता तालुक्यातील वाळकी येथे बिबट्याच्या हल्ल्यात गणीभाई कचरू शेख यांच्या शेळीचा मृत्यू झाला.

ही घटना १ जुलै रोजी पहाटे ३ वाजता घडली. बिबट्याने जाळीच्या कंपाऊंडवरून उडी मारून आत प्रवेश करत शेळ्यांवर हल्ला केला. बिबट्याने शेळीला जखमी केले, परंतु इतर जनावरांचा आवाज आल्याने शेख यांना जाग आली. तेव्हा बिबट्या शेळीला जाळीच्या खालून ओढण्याचा प्रयत्न करताना दिसला. शेख यांनी आरडाओरडा केल्याने बिबट्याने तेथून पळ काढला. शेख यांनी सकाळी सदर घटनेची माहिती पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. एणगे यांना दिली, ज्यामुळे जखमी शेळीवर उपचार करण्यात आले. परंतु संध्याकाळी सात वाजता शेळीचा मृत्यू झाला. संबंधित घटनेचा पंचनामा वनविभागाचे अधिकारी श्री. साखरे यांनी केला. या घटनेमध्ये मोठे आर्थिक नुकसान झाले असल्याचे शेतकरी शेख यांचे म्हणणे आहे. त्यांनी घटनेचा पंचनामा करून योग्य तो मोबदला देण्यात यावा अशी मागणी केली आहे. परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे. विशेष म्हणजे पशुपालकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. शेतकरी शेताला रात्री पाणी देण्यासाठी बाहेर पडत असतात, त्यामुळे रात्री अपरात्री केव्हाही बिबट्याचा हल्ला होऊ शकतो. यामुळे शेतकऱ्यांमध्ये भीती निर्माण झाली आहे. वनविभागाने बिबट्याचा शोध घेऊन त्यास जेरबंद करावे, अशी मागणी पशुपालन तसेच शेतकऱ्यांकडून केली जात आहे. यावेळी बिलाल शेख, सीताराम धीवर, चाँदभाई शेख शेतकरी उपस्थित होते.

जमीन अभिहस्तांतर प्रक्रिया होणार सोपी

ना. बावनकुळे : अल्प उत्पन्न गटाला दिलासा देणार

मुंबई (प्रतिनिधी)– सहकारी गृहनिर्माण संस्थांना कब्जे हक्काने प्रदान केलेल्या मिळकतीचे भोगवटादार वर्ग २ मधून भोगवटादार वर्ग १ मध्ये रूपांतर करण्यासाठी असलेली प्रक्रिया सोपी करण्यासाठी प्रमाणित कार्यपद्धती (एसओपी) तयार करण्यात येणार असल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुधवारी विधानसभेत एका लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात दिली. तसेच अल्प उत्पन्न गटातील रहिवाशांना रूपांतर करण्यासाठी प्रचलित वार्षिक दर विवरणपत्रिकेनुसार सध्या डे असलेली मूल्यांकनाच्या रक्कम १० टक्क्यांपेक्षा कमी करता येईल काय हे तपासले जाईल, असेही त्यांनी सांगितले

सहकारी गृहनिर्माण संस्थांना भोगवटदार वर्ग-२ मधून भोगवटदार वर्ग-१ मध्ये रूपांतरित करण्यासाठी येणाऱ्या अडचणींबाबत शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या सुनील प्रभू यांनी काल विधानसभेत लक्षवेधी सूचना मांडली होती. त्यावेळी झालेल्या चर्चेत भाजपचे आमदार अतुल भातखळकर यांनी जमीन भोगवटादार वर्ग २ मधून भोगवटादार वर्ग १ मध्ये करण्याबाबत सरकारने काढलेला आदेश अत्यंत क्लिष्ट असल्याची टीका करत सुटसुटीत आदेश काढण्याची मागणी केली होती.

या मागणीवर बोलताना बावनकुळे यांनी, जमिनीचे रूपांतर भोगवटादार वर्ग २ मधून भोगवटादार वर्ग १ मध्ये करण्यासाठी सुटसुटीत प्रमाणित कार्यपद्धती तयार केली जाईल. यात ही प्रक्रिया किती दिवसात पूर्ण होऊन प्रकरण निकाली निघेल हे पाहिले जाईल, असे स्पष्ट केले. या कार्यपद्धतीमुळे लोकांना सरकार दरबारी खेटे मारावे लागणार नाहीत, असेही बावनकुळे म्हणाले. अल्प उत्पन्न गटातील नागरिकांना परवडणाऱ्या दरात घरे मिळावीत ही सरकारची प्राथमिकता आहे. त्यामुळे नागरी निवारा वसाहतीतील सहकारी गृहनिर्माण संस्थांना येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी तातडीने कार्यवाही केली जाईल, असे आश्वासनही बावनकुळे यांनी दिले.

तत्पूर्वी, नागरी निवारा योजनेतील ११३ सहकारी गृहनिर्माण संस्थांना १५ ते २५ वर्षांपूर्वी सरकारने कब्जे हक्काने जमीन दिली होती. ही जमीन भोगवटदार वर्ग-२ मधून भोगवटदार वर्ग-१ मध्ये रूपांतरित करण्यासाठी प्रचलित वार्षिक दर विवरणपत्रानुसार (रेडी रेकनर) १० टक्के मूल्यांकन रक्कम आकारत आहे. परंतु, या संस्थांनी २७ जून २०२५ रोजी मुंबई उपनगरच्या जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन ही रक्कम १ टक्के पेक्षा जास्त न आकारण्याची मागणी केली आहे, अशी माहिती सुनील प्रभू यांनी यावेळी दिली. या चर्चेत भाजपच्या अमित साटम यांनीही भाग घेतला.

हृदयविकाराने होणाऱ्या मृत्यूंचा कोविड लसीशी संबंध नाही

प्राथमिक निष्कर्ष आरोग्य मंत्रालयाकडून सादर

नवी दिल्ली– देशात हृदयविकाराच्या झटक्याने होणाऱ्या अचानक होणाऱ्या मृत्यूंचा कोविड लसीशी थेट संबंध नाही, असे इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च आणि नॅशनल सेंटर फॉर डिसीज कंट्रोल यांनी स्पष्ट केले आहे.

या दोन्ही संस्थांनी १८ ते ४५ वयोगटातील लोकांच्या अचानक होणाऱ्या मृत्यूंवर आधारित अभ्यास केला. याबाबत आरोग्य मंत्रालयाने ही माहिती दिली. अभ्यासात भारताची कोविड लस सुरक्षित आणि प्रभावी असल्याचे पुष्टी करण्यात आली आहे. त्यामुळे होणाऱ्या गंभीर दुष्परिणामांची प्रकरणे दुर्मिळ आहेत. अभ्यासात असे म्हटले आहे की अचानक होणाऱ्या मृत्यूची इतर कारणे असू शकतात. यामध्ये अनुवंशशास्त्र, जीवनशैली, आधीच अस्तित्वात असलेले आजार आणि कोविडनंतरच्या गुंतागुंत यांचा समावेश आहे. अचानक होणाऱ्या मृत्यूंचे कारण समजून घेण्यासाठी या संस्था एकत्र काम करत आहेत. यासाठी, दोन संशोधन केले जात आहेत. पहिला मागील डेटावर आधारित होता आणि दुसरा रिअल टाइम तपासणीशी संबंधित आहे. आयसीएमआरच्या राष्ट्रीय महामारी विज्ञान संस्थेने (एनआयई) मे २०२३ ते ऑगस्ट २०२३ या कालावधीत १९ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील ४७ रुग्णालयांवर एक अभ्यास केला. ऑक्टोबर २०२१ ते मार्च २०२३ दरम्यान निरोगी दिसणाऱ्या पण अचानक मृत्यू झालेल्या लोकांचा डेटा पाहिला. निकालांवरून असे दिसून आले की कोविड लसीमुळे अचानक मृत्यूचा धोका वाढत नाही.

दुसरा अभ्यास अनुवांशिक उत्परिवर्तन हे बहुतेक मृत्यूंचे कारण याबाबत करण्यात आला. ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस (एम्स) आणि आयसीएमआरच्या मदतीने हा अभ्यास केला जात आहे. त्याचा उद्देश तरुण प्रौढांच्या अचानक मृत्यूची कारणे शोधणे आहे. अभ्यासाच्या सुरुवातीच्या डेटावरून असे दिसून आले की हृदयविकाराचा झटका किंवा मायोकार्डियल इन्फार्क्शन (एमआय) हे या वयात अचानक मृत्यूचे प्रमुख कारण आहे. महत्वाची गोष्ट म्हणजे गेल्या काही वर्षांत अचानक मृत्यूच्या कारणांच्या पद्धतीत कोणताही मोठा बदल झालेला नाही. बहुतेक मृत्यूंचे कारण अनुवांशिक उत्परिवर्तन आहे. हा अभ्यास अजूनही सुरू आहे. अभ्यास पूर्ण झाल्यावर अंतिम निकाल शेअर केले जातील.

विद्यार्थ्यावर अत्याचार; शिक्षिकेला अटक

पोक्सो कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल

मुंबई– १६ वर्षांच्या विद्यार्थ्यावर वारंवार लैंगिक अत्याचार करणाऱ्या ४० वर्षीय शिक्षिकेला पोलिसांनी अटक केली. तिच्याविरोधात बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण (पोक्सो) कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करून तिला अटक करण्यात आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गेला वर्षभरापासून ही शिक्षिका सदर विद्यार्थ्यासोबत बळजबरीने शरीरसंबंध ठेवत होती. त्यामुळे तो तणावाखाली होता. कुटुंबियांनी त्याच्या वागण्यातील बदल हेरून त्याला विश्वासात घेतले. त्यावेळी त्याने घडलेला प्रकार सांगितले. याप्रकरणी आरोपी शिक्षकाला अटक करण्यात आली आहे. आरोपी शिक्षका विवाहीत असून तिला एका मुलगा आहे. डिसेंबर २०२३ मध्ये शाळेतील वार्षिक स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमात विद्यार्थी या शिक्षिकेच्या संपर्कात आला होता.

जानेवारी २०२४ मध्ये या शिक्षिकेने पहिल्यांदा या विद्यार्थ्यावर अत्याचार केला. विद्यार्थ्याने सुरुवातीला दूर राहण्याचा प्रयत्न केला. पण ही शिक्षिका दुसऱ्या विद्यार्थ्यांच्या माध्यमातून त्याच्याशी संपर्क साधत होती. त्यामुळे तो तणावाखाली होता. आरोपी महिलेने त्याला मोटरगाडीतही बसवून निर्जनस्थळी नेऊन त्याच्यावर अत्याचार केला. त्यानंतर आरोपी महिलेने त्याला काही औषधाच्या गोळ्याही खाण्यासाठी दिल्या होत्या. तसेच महिलेने मुलाला पंचतारांकीत हॉटेलमध्येही नेले होते. या सर्व प्रकारामुळे मुलाने कुटुंबियांशी व मित्र-मैत्रिणींशी बोलणे कमी केले होते. गेल्यावर्षी डिसेंबर महिन्यात विद्यार्थ्याच्या आई-वडिलांना याबाबत कळाले. मात्र, बदनामीच्या भीतीने त्यांनी कोणतीही तक्रार केली नाही. आई-वडील मुलाचा निकाल लागण्याची वाट पाहत होते. आई-वडिलांना वाटले मुलगा १० वीत उत्तीर्ण झाल्यानंतर शिक्षिका आपल्या मुलाचा पाठलाग सोडेल. त्यानंतरही महिलेने पीडित मुलाला त्रास देणे सुरूच ठेवले. मुलाची मानसिक स्थिती पाहून अखेर कुटुंबियांनी याप्रकरणी पोलिसांकडे तक्रार करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी शिक्षेकेविरोधात नुकतीच तक्रार दाखल केली. पोलिसांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन शिक्षिकेविरोधात पोक्सो कायद्याअंतर्गत गुन्ह दाखल केला आणि त्यानंतर तिला अटक करण्यात आली. याप्रकरणी शिक्षिकेची चौकशी सुरू आहे.

अर्बन नक्षलवादी पंढरपूर वारीत शिरले

शिंदे गटाच्या आमदार कायंदे यांचा दावा

मुंबई– काही अर्बन नक्षलवादी पंढरपूर वारीत शिरले आहेत, ही ऐकीव माहिती नसून सबळ पुरावे समोर आले आहेत, असा दावा शिवसेना शिंदे गटाच्या आमदार मनीषा कायंदे यांनी सभागृहात केला आहे.

कायंदे यांच्या वक्तव्यावरुन नवा वाद निर्माण होण्याची चिन्हे आहेत. त्यांच्याकडे दुर्लक्ष करा, अशी प्रतिक्रिया आमदार आदित्य ठाकरे यांनी यावर दिली आहे.

पंढरपूरची वारी अशी आहे जिथे कोणी कोणाला निमंत्रण देत नाही. वेगवेगळ्या बोगस नावाखाली काही संघटना जसे पर्यावरण दिंडी, संविधान दिंडीसारख्या गोष्टी समोर आल्या आहेत. अंधश्रद्धा निर्मुलनाच्या नावाखाली हे सर्व सुरू आहे, असा आरोप करत कायंदे यांनी अंनिसकडे बोट दाखवले आहे. वारीला बदनाम करण्याचा प्रयत्न होतोय, मुख्यमंत्र्यांनी याची गंभीर दखल घेतली आहे. वारीचा गैरफायदा घेऊ नये हाच उद्देश आहे. महिला संविधानाचे पुस्तक घेऊन चालतात, संविधानाच्या नावाखाली फेक नॅरेटिव्ह पसरवणारी ही लोकं तेच तर नाहीत ना, असा सवालही कायंदे यांनी विचारला आहे.

पावसाने दडी मारल्याने बळीराजा हवालदिल

राहुरी तालुक्यावर दुबार पेरणीचे सावट

देवळाली प्रवरा (वार्ताहर)– गेल्या पंधरा दिवसांपासून रोज सुटणारा सोसाट्याचा वारा, सारखे असणारे ढगाळ वातावरण आणि त्यातून होणारा बुरबूर पाऊस, अशा वातावरणात पावसाने दडी मारल्याने बळीराजा हवालदिल झाला असून खरीप पिकांनी माना टाकण्यास सुरूवात केल्याने खरिप वाया जाण्याची भिती निर्माण झाली आहे.

मुळा व भंडारदरा धरणाच्या पाणलोटक्षेत्रात हलका पाऊस पडत असल्याने दिवसेंदिवस धरणाची पाणी पातळी वाढत आहे. जून महिन्यात ही धरणे निम्मी भरली आहेत. ही जरी समाधानाची व जमेची बाजू असली तरी धरणाच्या लाभक्षेत्राकडे पावसाने पाठ फिरवली असल्याने ही चिंतेची बाब म्हणावी लागेल. परिणामी खरीप धोक्यात आले आहे. यंदा कधी नव्हे ते प्रथमच २० मे पासून धो-धो अवकाळी बरसला. मान्सून वेळेपूर्वीच दाखल झाला. त्यामुळे बळीराजाच्या आशा पल्लवित झाल्या आणि बागायती भागात कपाशी, मका, सोयाबीन, तूर व ऊस पिकांची लागवड झाली. तर पठार भागात मका, कांदा, मूग, मठ, हुलगे, बाजरी, भुईमूग आदी खरीप पिकांची पेरणी केली. तालुक्यात खरीप ३६ हजार हेक्टर पेरणी क्षेत्र आहे. त्यापैकी आतापर्यंत अंदाजे ३१ हजार हेक्टर क्षेत्रावर जवळपास ८० टक्के पेरणी झाली आहे. साधारणपणे १५ जूनपर्यंत चांगल्याप्रकारे पावसाने साथ दिली. त्यामुळे ही पिके तरारून आली. पाऊस पडत राहिल्याने बळीराजाने महागडी बियाणे आणून लागवड व पेरणी केली. पिकांना जोमात येण्यासाठी महागाची रासायनिक खते दिली. त्यामुळे शिवार डोलू लागला. सर्वत्र निसर्गाचा हिरवा शालू पांघरून हळू हळू डुलू लागला. हे पाहून बळीराजाचे मन भरून आले. पण हा आनंद फार काळ टिकू शकला नाही. बघता-बघता पाण्याच्या अभावामुळे ही पिकं मरणास येऊ लागली. हिरवगार बहरलेलं शेतशिवार सुकू लागलं. हे बघून बळीराजाचं काळीज पिळवटून निघू लागलं. आज पाऊस येईल, उद्या पाऊस येईल या आशेवर रोज एक-एक दिवस मागे पडत गेला. बघता-बघता पंधरवाडा उलटून गेला. पाण्यावाचून पिकांची अत्यंत दयनीय अवस्था झाली. ज्या शेतकऱ्यांना पिकांना पाणी देणे शक्य आहे, त्यांनी पिकांना पाणी देणे सुरू केले. परंतु विजेचा सारखा लंपडाव सुरू असल्याने आणि एक आठवडा दिवसा व एक आठवडा रात्री असा शेतीसाठी विजपुरवठा होत असल्याने तिथंही बळीराजाचे हात टेकले आहेत. दिवसभर शेतात उभे राहून वाफा वाफा भरून पिकाला कसेबसे पाणी भरता येते. परंतु बिबट्यांची वाढती संख्या आणि त्यातून शेतकऱ्यांवर बिबट्यांचे होणारे जीवघेणे हल्ले, तसेच रानडूकराचे शेतात असणारे मोठे मोठे कळप यापासून शिवाराला मोठा धोका निर्माण झाल्याने शेतकऱ्यांना रात्री पिकांना पाणी भरणे म्हणजे एक तारेवरची कसरत झाली आहे. ही स्थिती बागायती भागातील आहे.

तालुक्यातील चिंचविहीरे, कणगर, गणेगाव, वडनेर, तांभेरे, तिळापूर, कानडगाव, वरशिंदे, वाबळेवाडी आदी पठार भागातील ज्या शेतकऱ्यांना शक्य आहे, त्यांनी तुषार सिंचनने पिकांना पाणी देणे सुरू केले आहे. मात्र सोसाट्याच्या वाऱ्यामुळे हे पाणी भलतीकडेच उडत असल्याने आधीच कमी असलेले पाणी वाया जात आहे. येत्या आठवडाभरात पाऊस न पडल्यास बळीराजावर दुबार पेरणीचं संकट कोसळण्याची टांगती तलवार दिसत आहे.

> महागडी बी-बियाणे व खते ओतून उभी केलेली पिके पावसा अभावी जळून जाण्याची भीती दिसत आहे. असे झाले तर दुबार पेरणीला पैसा आणायचा कुठून? कर्जबाजारी झाल्याने बँकांनी शेतकऱ्यांसाठी दरवाजे बंद केले आहेत. या विचाराने बळीराजाची झोप उडाली आहे.

> या खरिप हंगामासाठी ३२८ मे.टन युरियाच्या 'बफर स्टॉक'ला मान्यता दिली असून त्यापैकी मागील आठवड्यात १६८ मे. टन युरिया विक्रीसाठी खुली करण्यात आली होती. शिल्लक साठा पुढिल आठवड्यात विक्रसाठी खुला करण्यात येईल. बाजारात इतर रासायनिक खते मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. शेतकरी बांधवांनी काही खतांची उपलब्धता न झाल्यास पर्यायी मिश्रखतांचा वापर करावा. त्याच प्रमाणे नॅनो, युरिया, नॅनो डिएपी या खतांचा वापर केल्यास चांगले उत्पादन मिळते.
>
> **-बापूसाहेब शिंदे**
> तालुका कृषी आधिकारी

श्रीरामपुरात कांदा १४१० रुपयांपर्यंत

श्रीरामपूर (प्रतिनिधी)– श्रीरामपूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये काल ३५ वाहनातून मोकळा कांदा दाखल झाला. यात एक नंबरच्या कांद्याला ११०० ते १४१० भाव मिळला तर दोन नंबरला ८०० ते ११०० तर तीन नंबरला ६०० ते ८०० तर खादला ४०० ते ६०० व गोल्टीला ९०० ते १२०० रुपयापर्यंत भाव मिळला. तसेच १४२३४ गोण्यातून आवक झालेल्या एकनंबर कांद्याला १६०० ते २०००, दोन नंबरला ११०० ते १५५०, तीन नंबरला ७०० ते १०५० तर गोल्टीला १००० ते १५०० तसेच खादला २०० ते ६५० रुपये भाव मिळला आहे तर बटाटा आवक (१४५) १६०० ते १९०० रुपये , आले (२२) १२०० ते २००० रुपये, कोबी (२०) ७०० ते १००० रुपये, फ्लावर (११) ८०० ते १४०० रुपये, हिरवी मिरची (२६) २५०० ते ४००० रुपये, लसुण (१४) ३५०० ते ७०००रुपये, आंबा (१८०) २००० ते ५५०० रुपये, ड्रॅगन फूट (९) ४५०० ते ७००० रुपये तर मोसंबीला (२०) ३००० ते ५५०० रुपयांपर्यंत दर मिळाला असल्याची माहिती समितीचे सभापती सुधीर नवले पाटील आणि सचिव साहेबराव वाबळे यांनी दिली.

वीज कोसळण्याची पूर्वसूचना ॲपवर

मुंबई (प्रतिनिधी)– राज्यात वीज कोसळून होणारे मृत्यू टाळण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाची मदत घेण्यात येत आहे. सध्या ४० किलोमीटर परिघात वीज पडण्याची पूर्वसूचना दामिनी आणि सचेत पद्वारे दिले जात आहे. कमी परिघात वीज कोसळण्याची पूर्वसूचना देणारे नवीन ॲप विकसित करण्यात येईल, अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी बुधवारी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. महाजन म्हणाले, राज्यात पावसाळी वातावरणात वीज पडून होणाऱ्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असून, शेतकरी आणि ग्रामीण भागातील नागरिकांना याचा सर्वाधिक धोका होत आहे.

राहात्यात डाळिंब २५५ पर्यंत

राहाता (तालुका प्रतिनिधी)– राहाता बाजार समितीत बुधवारी डाळिंबाला प्रति किलो २५५ रुपये भाव मिळाला. डाळिंबाच्या ७९९६ कॅरेटची आवक झाली. नंबर एकला १६१ ते २५५ रुपये, नंबर दोनला ११६ ते १६० रुपये, तीनला ५१ ते ११५ तर नंबर चारला १० ते ५० रुपये प्रति किलो भाव मिळाला. गव्हाच्या ५ क्विंटलची आवक झाली. गव्हाला सरासरी २६७० रुपये भाव मिळाला. सोयाबीनची ११ क्विंटलची आवक झाली. सरासरी ४२७२ रुपये भाव मिळाला. हरभऱ्याला सरासरी ४२०० रुपये भाव मिळाला. ड्रॅगन फ्रूटच्या १७ कॅरेटची आवक झाली. सरासरी ८० रुपये भाव मिळाला, अशी माहिती बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर गोंदकर आणि सुभाष मोटे यांनी दिली.

पान १ वरुन

१२ टक्के श्रेणी लवकरच बाद

जर हा निर्णय प्रत्यक्षात आला तर टुथपेस्ट पासून ते किचनमध्ये लागणाऱ्या छोट्या-मोठ्या वस्तूंच्या किमती कमी होऊ शकतात. यातील बहुतेक वस्तूंवर सध्या १२ टक्के कर लागतो. हा कर कमी करून सरकार पाच टक्क्यांवर आणू शकते. जीएसटी परिषदेची बैठक लवकरच होणार असून यात जीएसटीच्या दर पुनर्रचनेकडे अनेकांचे लक्ष लागले आहे.

अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी जीएसटीचे दर कमी होतील, असे एका मुलाखतील सांगितले. आम्ही त्यावर काम करत आहोत. दर कमी केल्यास महसुलात वाढ होईल, असेही त्या म्हणाल्या. बहुप्रतिक्षित जीएसटीच्या ५६ व्या परिषदेची तारीख अद्याप जाहिर झालेली नाही. जुलैच्या सुरुवातीला ही बैठक होण्याची अपेक्षा आहे.

नॅशनल हेराल्ड प्रकरणात...

कोर्ट ३ जुलैला ऐकणार आहे.

ईडीच्या वतीने एएसजी एसव्ही राजू यांनी युक्तिवाद केला. त्यांनी सांगितले की, यंग इंडियनने असोसिएटेड जर्नल्स लिमिटेड विकत घेतले, ज्याची मालमत्ता २ हजार कोटी रुपयांची आहे. या अधिग्रहणासाठी यंग इंडियन प्रायव्हेट लिमिटेडची स्थापना करण्यात आली होती. असोसिएटेड जर्नल्स लिमिटेडच्या संचालकांनी काँग्रेसला लिहिलेल्या पत्रात लिहिले होते की, प्रकाशन बंद पडल्यामुळे आणि नियमित उत्पन्नाचा अभाव असल्याने ते कर्ज फेडू शकत नाहीत. त्यांनी असा युक्तिवाद केला की यंग इंडियनने सोनिया आणि राहुल गांधी हे त्याचे फायदेशीर मालक असल्याचे घोषित केले होते. सोनिया, राहुल, सुमन दुबे आणि सॅम पित्रोदा यांनी यंग इंडियनमध्ये महत्त्वाची पदे भूषवली. २००० कोटी रुपयांची मालमत्ता असलेली कंपनी ९० कोटी रुपयांच्या कर्जासाठी विकत घेण्यात आली. ही फसवणूक आहे.

असोसिएटेड जर्नल्स लिमिटेड काँग्रेसने नाही तर यंग इंडियनने विकत घेतले. हे एक षडयंत्र होते. काँग्रेसने व्याज घेतले नाही किंवा सुरक्षा घेतली नाही. ९० कोटी रुपयांचे कर्ज ५० लाख रुपयांना विकले गेले. हा एक गुन्हेगारी कट होता, ज्यामध्ये यंग इंडियनला बनावट कंपनी बनवण्यात आली, असा आरोपही वकिल राजू यांनी केला.

घाटघर, रतनवाडीत धुवाँधार पाऊस

पाणी वेगाने धरणाकडे झेपावत आहे. त्यामुळे गेल्या २४ तासांत (बुधवारी सकाळी ६ वाजेपर्यंत) भंडारदरा जलाशयात ३३९ दलघफू तर निळवंडेत २१६ दलघफू नवीन पाणी जमा झाले आहे. यामुळे पाण्याच्या पातळीत झपाट्याने वाढ होत आहे. याचबरोबर देवठाण येथील आढळा धरणाचा पाणीसाठाही बुधवारी सायंकाळी ९६.२३ टक्क्यांवर पोहोचला आहे. येत्या दोन-तीन दिवसांत आढळा धरण पूर्ण क्षमतेने भरण्याची शक्यता आहे. दरम्यान, जोरदार पाऊस कोसळत असल्याने भात रोपे पाण्याखाली गेली आहेत.

मुळा धरणात १३ हजार ५८७...

व आतापर्यंत ४ हजार ६८१ दलघफू नवीन पाण्याची आवक झाली आहे. त्यामुळे २६ हजार दलघफू क्षमता असलेल्या मुळा धरणाचा पाणीसाठा १३ हजार ५८७ दलघफू वर पोहचला आहे.

आठवडाभर मुसळधार पाऊस

हवामान विभागाकडून नागरिकांना सतर्कतेचा आवाहन करण्यात आले. विदर्भात बहुतांश ठिकाणी दुपारी पावसाची जोरदार हजेरी होती. मराठवाड्यात बहुतांश ठिकाणी ढगाळ वातावरण आहे. काही ठिकाणी हलक्या सरी येऊन गेल्या. दोन दिवसांपासून राज्यभर पावसाची हजेरी आहे. बहुतांश ठिकाणी पावसाचा जोर आहे. हवामान विभागाने उत्तर महाराष्ट्र, विदर्भ व मराठवाड्यातही वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाची शक्यता व्यक्त केली आहे.

श्रीरामपुरात बनावट भिंगरी...

नितीन देशमुख यांच्या आदेशान्वे पोलीस उपनिरीक्षक समाधान सोळंके, पोलीस हेड कॉन्स्टेबल दादासाहेब लोंढे, अमोल पडोळे, आजिनाथ आंधळे, मच्छिंद्र कातखडे, सागर बनसोडे आदींनी पार पाडली.

धनुष्यबाणावर तातडीने सुनावणीस...

जाईल. १७ फेब्रुवारी २०२३ रोजी निवडणूक आयोगाने एकनाथ शिंदे यांचा शिवसेनेवरील दावा योग्य असल्याचे म्हटले होते. आयोगाने शिवसेनेचे मूळ निवडणूक चिन्ह शिंदे गटाला दिले होते. याविरुद्ध उद्धव गटाने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. तेव्हापासून हे प्रकरण प्रलंबित आहे. दरम्यान, आता बुधवारी शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या वतीने ज्येष्ठ वकील देवदत्त कामत यांनी स्थानिक निवडणुकांचा हवाला देत लवकर सुनावणीची मागणी केली.

तात्काळ सुनावणीच्या मागणीला विरोध करताना शिंदे गटाच्या वकिलांनी सांगितले की, निवडणूक चिन्ह वाटपानंतर २ महत्त्वाच्या निवडणुका (लोकसभा आणि विधानसभा) झाल्या आहेत. ७ मे रोजी न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील नियमित खंडपीठासमोरही हीच मागणी करण्यात आली होती. खंडपीठाने या प्रकरणाची लवकरच सुनावणी घेण्यास नकार दिला. आता पुन्हा एकदा सुट्टीतील खंडपीठासमोरही तोच प्रयत्न केला जातोय. त्यावर उद्धव सेनेच्या वकिलांनी म्हटले की, ते राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार-अजित पवार वादात दिलेल्या व्यवस्थेची मागणी करत आहेत. यावर न्यायाधीशांनी त्यांना १६ जुलै रोजीच आपला मुद्दा मांडण्यास सांगितले.

जून २०२२ मध्ये, अविभाजित शिवसेना फुटली आणि दोन गटात विभागली गेली. यापैकी एक गट एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील आणि दुसरा गट उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील होता. दोन्ही गटांनी शिवसेनेच्या निवडणूक चिन्ह धनुष्यबाणावर दावा केला आणि प्रकरण निवडणूक आयोगाकडे गेले. निवडणूक आयोगाने एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेच्या बाजूने निर्णय दिला आणि ती खरी शिवसेना मानली. त्यानंतर शिवसेनेचे निवडणूक चिन्ह धनुष्यबाण एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला देण्यात आले.

आमदार संग्राम जगताप यांना...

भूमिका आणि वक्तव्यांमुळे आमदार जगताप चर्चेत होते. अशा पार्श्वभूमीवर त्यांना थेट जीवे मारण्याची धमकी मिळाल्याने राजकीय वर्तुळात तसेच नागरिकांमध्ये चिंता आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.